# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या – १०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: के-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**रूपये:- ४,५०,३७,४५,०००/-**<br>**श्री. मनोज जामसुतकर** |
| (१) | १५१७ | १०० | मुंबईतील माथाडी बोर्डावर पूर्णवेळ अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती न झाल्यामुळे माथाडी कामगारांसमोर अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. सध्या अनेक बोर्डांचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या (उदा. प्रभारी सहआयुक्त कामगार) माध्यमातून चालवला जात आहे. पूर्णवेळ बोर्ड नसल्यामुळे कामगारांच्या मजुरी वाढीचे निर्णय, लेव्ही (Levy) संबंधित प्रश्न आणि इतर धोरणात्मक बदलांवर शिक्कामोर्तब होण्यास विलंब होतो. प्रभारी अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार असल्याने कामगारांच्या दैनंदिन तक्रारींचे निवारण करण्यासाठी लागणारा वेळ वाढतो. यामुळे प्रशासकीय औपचारिकतांच्या नावाखाली कामगारांची छळवणूक होण्याची शक्यता असते. माथाडी मंडळाच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या घरकुल योजना, आरोग्य विमा आणि इतर सामाजिक सुरक्षा लाभांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, ज्यामुळे हजारो कामगार लाभांपासून वंचित राहत आहेत. तसेच बोर्डात पूर्णवेळ सदस्य नसल्याने कामगार, मुकादम आणि बोर्ड यांच्यात योग्य समन्वयाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे माथाडी कामगार बोर्डावर पूर्णवेळ अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक तातडीने करण्याची आवश्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**रूपये:- १,७३,७५,८०,२९,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (२) | १४९३ | १० | माणगाव तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, येथील माणगाव बाजार ते तळीवाडी दरम्यान मुख्य वीज वाहिनी उपलब्ध नसल्यामुळे सध्या जास्त अंतरावरून तसेच जंगल भागातून वीज पुरवठा केला जात आहे. जंगल भागातून वीज वाहिन्या जात असल्यामुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे माणगाव बाजार ते तळीवाडी दरम्यान थेट नवीन मुख्य वीज वाहिनी टाकण्याची आवश्यकतेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | १४९४ | १० | माणगाव,तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथील वीज उपकेंद्र अंतर्गत मोठ्या भौगोलिक क्षेत्राचा समावेश असून आवश्यक प्रमाणात कर्मचारी उपलब्ध नाहीत. हा परिसर डोंगराळ व जंगलव्याप्त असल्यामुळे विशेषतः पावसाळ्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होतो. वाहतुकीच्या सुविधांचा अभाव व कमी कर्मचारी यामुळे वीज पुरवठा पूर्ववत करण्यास मोठा कालावधी लागतो. त्यामुळे माणगाव खोऱ्यातील वीज समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी भूमिगत वीज वाहिन्या टाकण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १५०० | १० | माणगाव ,तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथील ट्रान्सफार्मर क्रमांक ४१४५६०६ याची क्षमता ६३ KVA असून त्यावरून धुरीवाडी, सुतारवाडी व तळीवाडी येथील ग्राहकांना विज पुरवठा केला जातो. ग्राहकांना २३० व्होल्ट ऐवजी फक्त १९० ते २०० व्होल्ट इतका कमी विद्युत दाब मिळत असल्यामुळे पाण्याचे पंप, घरगुती उपकरणे तसेच सुतारकामाच्या मशीन योग्यरीत्या चालत नाहीत व जळण्याच्या घटना घडत आहेत. तसेच या भागातील बहुसंख्य ग्राहक शेतकरी असून कमी विज दाबामुळे दिवसा शेती पंप चालत नसल्याने रात्री उशिरापर्यंत शेतात काम करावे लागते. त्यामुळे माणगाव येथील सद्याचा ट्रान्सफार्मर ६३ KVA वरून किमान १०० KVA किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेचा करावा अथवा सुतारवाडी भागासाठी स्वतंत्र ट्रान्सफार्मर मंजूर कराण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | १४६६ | १० | मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीने गावच्या सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये रात्रीच्या वेळेस अंधारात प्रेतावर अत्यंससकार करणे गैरसोयीचे होत असल्याने स्मशान भूमीच्या रस्त्यावर तीन स्ट्रीट लाईट खांब तसेच, धामापूर (गावडेवाडी) येथे वाडीजोड रस्त्यावर एक स्ट्रीटलाईट खांब असे एकूण चार स्ट्रीटलाईट खांब बसवून देण्याबाबत मा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ मर्यादित, कुडाळ, विभाग सिंधुदूर्ग यांचेकडे पत्र क्रमांक ८३/ग्रा.पं./२०२५, दिनांक २२ जुलै, २०२५ रोजी पत्राद्वारे मागणी करणे, या चार स्ट्रीटलाईटच्या कामासाठी सिंधुदूर्ग जिल्हा डीपीडीसी मधून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे चौके सेतू कार्यालयामधून online उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्यादित, मालवण उपविभाग मालवण यांचेकडे सादर करणे, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ मर्यादित, कुडाळ यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक : SE/SC/Tech/2881, दिनांक 14 ऑगस्ट, 2025 नुसार प्रस्ताव मा.जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग यांचेकडे सादर करणे, परंतु सिंधुदूर्ग महावितरण विभागाने सिंधुदूर्ग नियोजन विभाकाडून निधी उपलब्ध करुन घेण्यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा न केल्यामुळे धामापूर ग्रामपंचायतीने मागणी केलेले चार स्ट्रीटलाईट खांब बसवून देण्यासंदर्भात अद्यापपर्यन्त काहीही कार्यवाही न करणे. सबब, यामुळे धामापूर गावातील नागरीकांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | १४६८ | १० | महावितरण कंपनीने राज्य वीज नियामक आयोगाकडे २० ते ४० टक्के वीज दरवाढीचा प्रस्ताव सादर केला असून, यामुळे सर्वसामान्य घरगुती ग्राहक, शेतकरी आणि लघुउद्योजकांचे कंबरडे मोडणार असणे, गुजरात, कर्नाटक आणि तेलंगणा यांसारख्या शेजारील राज्यांत विजेचे दर महाराष्ट्राच्या तुलनेत अत्यंत कमी (सरासरी ₹२ ते ₹७ प्रतियुनिट) असताना, महाराष्ट्रात हेच दर ₹४.४ ते ₹१२.८ प्रतियुनिट इतके चढत्या भावात असणे, वीज निर्मितीचा खर्च सर्व राज्यांत सारखा असताना केवळ महाराष्ट्रातच वीज महाग असण्याचे कारण काय ? या दरवाढीमुळे राज्यातील लघु आणि मध्यम उद्योग शेजारील राज्यांत स्थलांतरित होण्याच्या विचारात असणे, ज्याचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर आणि रोजगारावर विपरित परिणाम होत असणे, एकीकडे शासन स्वस्त विजेचे आश्वासन देत असताना, दुसरीकडे विशिष्ट खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी ही दरवाढ लादली जात असल्याचा जनसामान्यांत संताप व्यक्त होत असणे, शासनाने ही प्रस्तावित दरवाढ तत्काळ रद्द करावी आणि उद्योगांना व सर्वसामान्यांना दिलासा देण्याबाबात, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १४८९ | १० | राज्यशासनाच्या महावितरण कंपनीने राज्य वीज नियामक आयोगाकडे २० ते ४० टक्के वीज दरवाढीचा प्रस्ताव एका उद्योजकांच्या भल्यासाठी सादर केला असल्याचे दिनांक. १६/२/२०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या वीजदर वाढीमुळे राज्यातील सर्वसामान्य वीज ग्राहक, छोटे, मध्यम, लघू उद्योजकांचे कंबरडे मोडणार असणे, शेजारच्या गुजरात, कर्नाटक, तेलगंणा राज्यात महाराष्ट्रापेक्षा वीजेचे दर कमी असणे आणि वीज निर्मितीसाठी लागणारा खर्च सर्व राज्यात सारखा असतांना महाराष्ट्राचा वीज महाग का असा प्रश्न निर्माण होणे, आपली वीज महागअसल्यामुळे नवीन उद्योग राज्यात येण्यास तयार नसणे, अनेक उद्योगही इतर राज्यात स्थलांतरच्या विचारात असणे, त्यामुळे या वीजदरवाढीचा थेट परिणाम राज्याच्या अर्थ व्यवस्थेवर  होण्याची भिती व्यक्त होत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८१०, नवीन व नवीनीकरण ऊर्जा**<br>**रूपये:- ४०,२५,८९,०१,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (८) | १४६३ | १० | शासनामार्फत "मागेल त्याला सौर ऊर्जा कृषी पंप" हा कार्यक्रम राबविण्यात येत असून राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत. मात्र अर्ज करूनही शेतकऱ्यांना सौर कृषी पंप मिळण्यासाठी अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत आहे. काही प्रकरणांमध्ये अर्ज प्रलंबित राहणे अथवा तांत्रिक कारणांमुळे अर्ज रद्द होणे अशा तक्रारीही मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणींचा सामना करावा लागत असून कृषी उत्पादनावरही परिणाम होत आहे. म्हणून सौर कृषी पंपाचे वितरण वेगाने |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करण्यासाठी तसेच प्रलंबित अर्जांवर तातडीने निर्णय घेण्याबाबात, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग**<br>**रूपये:- ४,९४,७४,१५,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (९) | १४७८ | १० | आशा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित वरळी, मुंबई व विजयश्री बेरोजगार सेवासंस्था, वरळी, मुंबई या दोन्ही संस्था नोंदणीकृत असणे, मुला-मुलींना प्रशिक्षण व्यक्ती महत्व विकास, सामाजिक कार्य आदी समाजोपयोगी कार्य करत आहे. या संस्थेचे वाढते सामाजिक कार्य विचारात घेऊन संस्था अधिक गतिमान होण्यासाठी जागेची अडचण आहे, त्यांना सोसाव्या लागणाऱ्या अनेक गंभीर समस्यांमुळे संस्थेने बी.डी.डी.चाळ क्र.४६ मधील खोली क्र.३ व ५ सामाजिक कार्यासाठी मिळाव्यात म्हणून शासनाकडे मागणी केली आहे, परंतु आजमितीस कोणताही निर्णय घेण्यात न आल्यामुळे संस्थेच्या दिवसेंदिवस वाढीस लागलेल्या कामांमुळे अपुऱ्या जागेअभावी गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत, सदरहू संस्थांना विना विलंब मागणीप्रमाणे कक्ष देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**रूपये:- ७५,५१,९५,८३,०००/-**<br>**श्री. हेमंत ओगले** |
| (१०) | १५१४ | १० | श्रीरामपूर जि.अहिल्यानगर येथील एम.आय.डी.सी. मध्ये रस्ते, विद्युत दिवे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र या मूलभूत व अत्यावश्यक बाबींच्या सुधारणांबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई